# नांदेड शहर व ग्रामीण भागात कोम्बिंग ऑपरेशन



**नांदेड/ प्रतिनिधी**

सध्या सणासुदीचे दिवस असल्याने नांदेड शहर व परिसरातील गुन्हेगारीला आळा घालण्याचा प्रयत्न पोलिस यंत्रणा करीत आहे. या अनुषंगाने शहरातील विविध पोलिस ठाणे व नांदेड ग्रामीण पोलिस ठाणे अंतर्गत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात कोम्बिंग ऑपरेशन राबविले जात आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलिस अधीक्षक अविनाश कुमार, गोहर हुसेन, इतवारा उपविभागीय पोलिस अधिकारी सुनीलकुमार नायक, शहर उपविभागीय पोलिस अधिकारी सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनात शहरातील विविध पोलिस ठाणे व नांदेड ग्रामीण व अन्य भागात गुन्हेगारांवर वचक बसविण्यासाठी कोंबिंग ऑपरेशन व नाकाबंदी करण्यात आली आहे. या अनुषंगाने दि,१० नोव्हेंबर रोजी रात्री ११ पासून पहाटे ४ पर्यंत शहरातील ६ पोलिस ठाण्याच्या हद्दीत १६ ठिकाणी नाकाबंदी पॉईंट लावण्यात आले होते. सदर नाकाबंदीमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलिस ठाणे प्रभारी,गुन्हे शोध पथकातील अंमलदारांनी एकूण ७३ मालाविरूध्दचे गुन्हेगार (दरोडा, जबरी चोरी, घरफोडी) चेक केले. कोटपा अंतर्गत धाड टाकण्यात आली. तसेच कलम ११०/११७ महाराष्ट्र पोलिस कायद्याप्रमाणे १९ केसेस, मोटार वाहन कायद्यान्वये १२ केसेस करण्यात आल्या आणि १० हजार ४०० रुपये दंड वसूल करण्यात आला. भारतीय हत्यार कायद्यान्वये २ केसेस नोंदवण्यात आल्या आणि ४ तलवारी, २ खंजर जप्त करण्यात आल्या आहेत. रात्री उशिरापर्यंत हॉटेल सुरु ठेवल्या प्रकरणी एका विरुध्द कारवाई करण्यात आली. सदर कोंबिंग ऑपरेशनमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक जगदीश भंडरवार, २८ पोलिस अधिकारी, १०१ पोलिस अंमलदार यांनी सहभाग घेतला.

# घरीच बनवायचे तलवार, कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान शस्त्रास्त्र जप्त



लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील गुन्हेगारांवर आळा घालण्यासाठी शहरातील सहा पोलिस ठाण्याच्या हद्दीत १० नोव्हेंबरला १६ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. या नाकाबंदीत ७३ गुन्हेगार तपासण्यात आले असून, चार तलवारी आणि दोन खंजर जप्त करण्यात आले आहेत.

शनिवारी पहाटेपर्यंत पोलिसांची ही कारवाई सुरू होती. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, गौहर हसन, उपाधीक्षक सूरज गुरव, सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली १० नोव्हेंबरच्या रात्री अकरा वाजल्यापासून ते ११ नोव्हेंबरच्या पहाटे चार वाजेपर्यंत शहरातील सहा पोलिस ठाण्याच्या हद्दीत १६ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली होती. या नाकाबंदीत शहरातील सर्वच पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, गुन्हे शोध पथकातील कर्मचारी सहभागी झाले होते. पोलिसांनी ७३ गुन्हेगार तपासले. त्यात मोटार वाहन कायद्याप्रमाणे १२, कोटपा अंतर्गत रेड एक, हत्यार कायद्याअंतर्गत दोन केसेस करण्यात आल्या आहेत. उशिरापर्यंत सुरू असलेल्या एका हॉटेलवर कारवाई करण्यात आली. या नाकाबंदीत २८ पोलिस अधिकारी आणि १०१ कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

## कौठा भागात घरावर छापा

१ शहरातील कौठा भागात एका घरात तलवारी तयार करून त्या विक्री करण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर उपाधीक्षक सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. पोलिस उपनिरीक्षक आनंद बिचेवार, जामोदकर, बुक्तरे, मटवाड, पिंपरखेडे यांच्यासह आरसीपी प्लाटूनने कोम्बिंग ऑपरेशन सुरु केले होते.

२ त्यात खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी कौठा भागातील करणसिंग बावरी आणि सागरसिंग बावरी या दोघांच्या घरावर छापा मारला. यावेळी आरोपी पळून गेले. पोलिसांनी घराची झडती घेतली असता चार तलवारी, खंजर आणि तलवार ठेवण्यासाठी असलेल्या २४ मॅन आढळून आल्या. या प्रकरणात पोलिस उपनिरीक्षक बिचेवार यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद झाला.